



॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र


## ई - प्रशिक्षक

वर्ष २ : अंक १० / जूलै २०१५







निवड भवितव्याची




कुठे जात आम्ही ........... पुढे काय आहे?




अभिमापन क्षमता चाचणी

# संपादकीय

सस्नेह नमस्कार

जुन महिना परीक्षेच्या निकालाचा तर जुलै महिना प्रवेशाचा ! कोणत्या शाखेला जायचे ? स्कोप कशाला आहे ? कोणती करियर करू ? मला काय झेपेल ? मला काय आवडते ? कुटुंबाला लगेच कशाची गरज आहे ? असे नाना प्रश्न मुलांसमोर आणि त्यांच्या पालकांसमोर उभे राहतात. प्रवेश केंद्रीय स्तरावर होत असल्याने पर्याय निवडणे, पसंतीक्रम देणे यासारख्या चक्रव्यूहातून विद्यार्थी आणि त्यांचे पालक जात असतात.

स्वतःच्या स्वाभाविक कलाला अनुसरून आणि अंगी असलेल्या विविध क्षमता व कौशल्य यांचा विचार करून योग्य अभ्यासक्रम निवडणे हे आव्हान आहे. त्यातच संधीचे वैविध्य वाढते आहे. नवनवीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत. पारंपारिक कला-वाणिज्य-विज्ञान या पलीकडे जाणारे अभ्यासक्रम पुढे येत आहेत. समोर असणाऱ्या संधी, स्वतःची आवड आणि कुवत व आर्थिक परिस्थिती याचा विचार करत अभ्यासक्रमाची निवड करायची असते.

मला काय आवडते ? मला काय जमते आणि समाजाला कशाची गरज आहे ? या प्रश्नांची उत्तरे एकवटली तर समाधान मिळणारा अभ्यासक्रम आणि त्यातून करियर मार्ग निश्चित होत जातो. यासाठी मार्गदर्शन सल्ला कसा घ्यावा ? काळ चाचणी करून घ्यावी का नको ? यासारख्या प्रश्नांची उत्तरे एकवटली तर समाधान मिळणारा अभ्यासक्रम आणि त्यातून करियर मार्ग निशित होत जातो. यासाठी मार्गदर्शन सल्ला कसा घ्यावा ? काळ चाचणी करून घ्यावी का नको ? यासारख्या प्रश्नांची उत्तरे देणारे लेख या अंकात आहेत.

अत्यंत अनुभवी मार्गदर्शकांनी हे लेख लिहिले आहेत. प्रशिक्षकच्या वाचक-शिक्षकांना त्याचा उपयोग करून आपापल्या ठिकाणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येईल असा विश्वास वाटतो.

विवेक पोंक्षे

# निवड भवितव्याची

एका खेळामध्ये मुलांना विचारण्यात आलं की,समजा,एका जहाजातून जगातील अनेक थोर मंडळी प्रवास करताहेत – महात्मा गांधी, अल्बर्ट आइन्स्टाईन,रूझवेल्ट,हेन्री,इंग्लंडची राणी इत्यादी अन् समुद्रात अचानक तुफानी वादळ सुरू झालं. या लोकांना वाचवायचे शर्थीने प्रयत्न सुरू करायचेत. एका वेळी मात्र एकालाच वाचवणं शक्य आहे.किती वेळ मिळेल सांगता येत नाही,वाचतील तेवढे वाचतील,उरलेल्यांना जलसमाधी मिळणे शक्य.तर तुम्ही कुणाकुणाला ,कोणत्या क्रमाने वाचवाल?

मग प्रत्येकजण खेळात आपापला क्रम ठरवतो अथवा ठरवते.सगळयांचं सांगून झालं, की शिक्षक कारणं विचारायला सुरूवात करतात. इथं क्रम लावणंही अवघड आणि कारणं देणं त्याहून अवघड. एकाची थोरवी दुसऱ्यापेक्षा कशाच्या आधारावर मोठी ठरवायची?

ऐतिहासिक काळातील या थोर व्यक्ती वेगवेगळया क्षेत्रातल्या खऱ्या,त्यामुळं त्यांच्यांत तर-तम करण्यापेक्षा त्यांना एका पंक्तीला बसवणं हेच श्रेयस्कर. आजच्या काळातल्या व्यक्तींची नावं घेऊन खेळ खेळण त्याहून अवघड. समजा नावं न घेता त्यांचा पेशा निवडला तर काय होईल? म्हणजे, त्या जहाजात एक शिक्षक, एक उद्योगपती, एक समाजसेवक, एक राजकारणी, एक शास्त्रज्ञ आहेत आणि वादळ सुरू झालं....... काय कराल?

काही मुलं शोधू लागतील,'त्यात डॉक्टर आहे का? इंजिनीअर तर नाही ना? एखादा कॉम्प्यूटर स्पेशालिस्ट? किंवा एखादा एम.बी.ए. आणि हो,आपले लाडके नट-नटी आणि पॉप गायक यांच्यापैकी कोणी नाही ना? मग मारो गोली! बुडेना का जहाज! जमलं तर वाचवू एक दोघांना, नाही तर त्यांचं नशीब ! हे राजकारणी तर अगदी.....'

मित्रांनो, हा खेळ काल्पनिक नाही. आपल्या आजूबाजूला पाहिलंत, तर आपण स्वत:च या जहाजात बसलो आहोत असं लक्षात येईल आणि समुद्र खवळला आहेच, कोणत्याही क्षणी लाटा आपल्यापर्यंत येऊन पोहोचतील. किनारा सोडून कोणी १० किलोमीटर आलंय तर कोणी 12 किलोमीटर आणि ऐन वादळाच्या तोंडावर आपलं होकायंत्र हरवलं? वळायचं कुठं?

दहावी-बारावी नंतर काय, हा यक्षप्रश्न अनेकांना भेडसावत असतो. एकदा डॉ.श्रीराम लागू सांगत होते," अहो,आमच्या वेळेला म्हणजे १९४५ साली, ५० टक्के गुण मिळाले की मेडिकलला सहज प्रवेश मिळे! फर्स्ट क्लास एखाद्यालाच असायचा. आज ग्रूप टोटल अमुक इतकी झाली की वाचलात आणि एक दशांशाने जरी चुकली तरी जहाज जणू बुडलेच समजा!" ज्या महाराष्ट्रात दहावी परीक्षेला बसलेल्यातली ५० टक्के मुलं नापास होताहेत, तिथं उत्तीर्ण झालेल्यांमध्ये जीवघेणी स्पर्धा आश्चर्यकारक आहे. बारावीतला ९९ टक्केवाला शहाणा आणि ९८ टक्केवाला अपात्र,त्याने खुशाल घरच्यांची बोलणी खावी.असला वेडगळपणा आजच्या परिस्थितीमुळे जीवनाचा भाग बनून राहिलाय.

कशामुळ हे सगळं? स्पर्धा, धकाधक, रहदारी हे यशस्वी जीवनाचं लक्षणच आहे मुळी. जपानमध्ये म्हणे अमुक एका कंपनीत नोकरी मिळवायची असेल, तर एका विशिष्ट दर्जेदार कॉलेजमधून पदवी मिळालेली हवी,अन् त्या कॉलेजात प्रवेश मिळायला तमुक एका शाळेतून तयारी केली तरच तेवढे मार्क पडतात. बरं,त्या शाळेत फुकाफुकी (हे जपानी नाव नाही!) प्रवेश नसतो, प्राथमिक शाळा कोणती यावर ते अवलंबून आणि त्या प्राथमिक शाळेच्या प्रवेशासाठी ...... बाप रे !

महाराष्ट्रातल्या शहरांमध्ये आज बहुतांश हीच परिस्थिती आहे. तालुक्यापर्यंत ती पसरत चालली आहे. जग ज्याला श्रेष्ठ म्हणत,तसं होण्यासाठी धडपड करण्यात चूक तरी काय आहे?

जग म्हणजे आपल्या आजूबाजूचे सगेसोयरे व मित्रमैत्रिणी. ते कशाला थोर म्हणतील, याचा काही नेम नाही. ५० वर्षांपूर्वी वकील आणि बॅरिस्टर यांना थोर म्हणायचे, आय.सी.एस.म्हणजे तर प्रतिरूप गोरा साहेबच. हळूहळू हे वारं डॉक्टरीकडे वळलं. परदेशात भारतीय डॉक्टरांना मागणी प्रचंड वाढली. नंतर सर विश्वेश्वरय्या यांच्या नावामुळे सिव्हील इंजिनिअरिंग आणि सरकारी नोकरी यांच वजन वाढलं. महाराष्ट्रात डिझेल इंजिन,स्कूटर्स,रिक्षा,ट्रक यांचं उत्पादन जसं होऊ लागलं तसं मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा भाव वधारला आणि त्याला प्रवेश मिळणं अवघड होऊन बसलं. मग एम.बी.ए.ची लाट आली.कारखान्यात पाऊल टाकण्यापूर्वीच सर्वज्ञता आलेले नेकटायवाले इतरांकडे तुच्छतेने पाहू लागले. पुढे त्यांची संख्या एवढी वाढली की ते प्रतीक्षा यादीवर जाऊ लागले. इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटरचा जमाना आला. त्या झंझावातामुळे तर १९८० च्या पूर्वी डबल ग्रॅज्युएट झालेले सगळे लोक जणू निरक्षर वाटायला लागले. कॉम्प्यूटर चालविता न येणारा मनुष्यजीव पृथ्वीवर जगण्यास अपात्र इतकी परिस्थिती येऊन ठेपली आहे आणि आता इंटरनेटला ॲक्सेस नसेल, शिवाय गाडीत मोबाईल फोन नसेल, तर तुमच्या जगण्याला काय अर्थ आहे?

मग कोण संस्कृतच्या संहिता पाठ करतो? कोणाला प्लेटो काय म्हणाला आणि भगवान बुद्ध व शंकराचार्य यांच्या प्रतिपादनात काय फरक आहे, हे जाणून घेण्याएवढी उसंत आहे? अहो, कालिदासाची नाटके सोडाच; पण बिचाऱ्या शेक्सपिअरलाही म्युझियममध्ये कोंडल्यासारखं झालं आहे. शेती,आयुर्वेद,हस्तकला या तर गावकुसाबाहेरच्या दुय्यम जीवनश्रेण्या झाल्या. टी.व्ही.आणि फ्रीज विकणाऱ्या पोऱ्याला जी प्रतिष्ठा आली ती दोन एकरात टोमॅटो करणाऱ्या कष्टकऱ्यात राहिली नाही. पेजर कमरेला लावून इकडचे टपाल तिकडे देणाऱ्याला करिअर आहे, भाताचा शेतकरी मात्र ऐन वेळी खताला पैसे कोठून आणणार, या विवंचनेतच आहे.

शिक्षण सोडलेले गुंड किंवा उच्च शिक्षित खानदानी मंडळी ही राजकारणाची वाट चोखाळताहेत. सामाजिक दृष्ट्या पुढारलेले मध्यमवर्गीय स्पर्धेचा मुकाबला करीत मोक्याच्या जागा पटकावताहेत. नोकरीवाले,परदेशी कंपन्यांकडे अर्ज टाकून पहिल्या फटक्यात वीस हजार रूपये दर महिना पगार कसा मिळेल,या विवंचनेत आहेत. भारताचे सरासरी वार्षिक उत्पन्न दरमाणशी रू.६,२९५ आहे. येथे दरमहा त्याच्या तिप्पट अपेक्षा.

लक्ष्मी मित्तल किंवा हिंदुजा होण्याची स्वप्नं पाहण्यात वावगं नाही. जगातल्या पहिल्या १०० श्रीमंत लोकांत हे दोघं आणि काही भारतीय आहेत. जगातला उत्तम डॉक्टर किंवा कॉम्प्यूटर किंग बिल गेट्स होण्यासाठी होड लावण्यात गैर काही नाही. दुसऱ्याच्या तंत्रज्ञानाच्या जोरावर तिसऱ्याचे शोषण करणाऱ्या परदेशी कंपन्यांचे अब्जावधी डॉलर्स खेळवत व्यवस्थापनशास्त्राचे अध्वर्यू म्हणवण्यात गुन्हा काही नाही. **गुन्हा आहे तो भारतीय देहात 'इंडिया इज अ रॉटन कंट्री' म्हणणारी परकीय मनं बाळगण्याचा !**

लॉर्ड माउंटबॅटन १९४७ साली येथून गेला; लॉर्ड मेकॉले अद्याप गेलेला नाही. शिक्षणपद्धतीचे पारतंत्र्य एवढे जबरदस्त आहे, गोऱ्यांचे लष्करी साम्राज्य मावळले;पण मनावरचे वर्चस्व अजून तसेच आहे. आता अमेरिकेला तर लढाई करण्याचीही आवश्यकता उरलेली नाही. तिच्या आर्थिक साम्राज्याचे गुलाम तिसऱ्या जगाची शिखर परिषद भरवताहेत.

स्वाभिमानशून्य, स्वत्वाची ओळख विसरलेले, स्वत:च्या देशाच्या वारशाची किंमत न कळणारे, पाश्चिमात्य आकर्षणाने चंगळवादाला पैसा पुरे पडावा म्हणून कोणत्याही नीतिमूल्याची तमा न बाळगणारे, आपल्या मातृभूमीच्या नैसर्गिक साधन-सामग्रीचा विध्वंस करण्यास मागेपुढे न पाहणारे असे समाजमन आजच्या शिक्षण पद्धतीतून आपण तयार करीत आहोत. सर्वसामान्य माणूस भ्रष्ट झाला; म्हणून भ्रष्टाचारी गुंडांच्या हातात राजकारण गेले आणि त्यामुळे काठावर तगून राहिलेला, उरलेला सामान्य माणूसही मूल्यहीनतेच्या आवर्तात ढकलला गेला.

यातून बाहेर येण्यासाठी बारावीनंतर कोणत्या अभ्यासक्रमास जावे; तेवढी ग्रूप टोटल भरण्यास कोणते रसायन आणि कोणते गणित हाताशी येईल?

फळप्रक्रिया करून शेतमाल निर्यात करणाऱ्या कृषी पदवीधराला आज दरमहा पंचवीस हजार रूपये मिळावेत आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळावी. भारतीय भाषांमधील तत्त्वज्ञानाचा परिचय जगाला करून देणाऱ्या स्नातकांना राष्ट्रीय पुरस्कार मिळावयास हवेत. सेंद्रिय शेती, आयुर्वेद, योग, हिंदुस्थानी संगीत यात नोबेल पारितोषिके मिळवू इच्छिणाऱ्या, संशोधन करणाऱ्या संशोधकांचे भारतीय विद्यापीठात निकोप स्पर्धेचे रान उठावे, सौर ऊर्जेचा वापर करून पत्थर फोडणे, धूरविरहीत चलनवलन साधणे,अस्तंगत होत जाणाऱ्या वनस्पतींवर संशोधन करून मानवाला १०० वर्षांचे निरोगी आयुष्यमान मिळवून देणे ही आमची कर्तृत्वाची नवी शिखरे व्हावयास हवीत. त्यासाठी नवे अभ्यासक्रम लिहावे लागतील. बुद्धिमानातल्या बुद्धिमान मुलांनी तिकडे वळावे लागेल. आर्ट्स, कॉमर्स या विद्याशाखा इतर काही जमलं नाही म्हणून जाण्याच्या विद्याशाखा अशा उरलेल्या नसाव्यात. सगळ्याच विद्याशाखांना समान प्रतिष्ठा यावी. अवकाश संशोधनातील अव्वल दर्जाचा शास्त्रज्ञ आणि ज्वारीच्या पिकावर संशोधन करणारा कृषितज्ज्ञ देशाच्या दृष्टीने सारख्याच मोलाचे व्हावेत.

शिक्षक होणं हे परमभाग्याचं वाटावं. लक्षाधीशाच्या पदरी चार शिक्षणसंस्था मांडलिकासारख्या असण्याऐवजी शिक्षणातील गुणवत्ता आणि नीतिमत्ता एवढी वाढावी की धनिक त्याकडे आदराने व बरोबरीच्या नात्याने पाहू लागतील.

हे सगळे घडण्यासाठी **गुणी मुलांनी रूढ चाकोरी सोडून नव्या करिअर्सचा पायंडा पडायला हवा.** खरंतर उद्योजकता ही शिक्षणावर फारच थोडी अवलंबून आहे. ती धडपड अंगी बाणवली तर स्पर्धेच्या युगात टिकून राहण्याची आशा आहे.

मास्टर्स इन सोलर एनर्जी, पीएच.डी.इन ऑरगॅनिक फार्मिंग, ग्रॅज्युएट इन वॉटरशेड मॅनेजमेंट, एम.बी.ए.इन रूरल रिकन्स्ट्रक्शन, कॉम्प्युटर स्पेशालिस्ट इन रिसोर्स लिटरसी, एम.टेक.इन अॅप्रोप्रीएट टेक्नोलॉजी आणि डॉक्टर्ससाठी सुपरस्पेशालिटी इन नॉन प्रिस्क्रिप्शन ऑफ मेडिसिन असे उद्याचे अभ्यासक्रम व्हावयास हवेत. त्यात प्रवेश मिळवायला केवळ परीक्षेतील गुण पुरणार नाहीत, प्रेरणा लागेल. पाठ्यपुस्तकांच्या बाहेरची धडपड लागेल. शासनाच्या प्रशासकीय सेवांमध्ये या सर्वांचा समन्वय लागेल.

भारत महासत्ता बनवण्यासाठी हा सूर्य आपल्याला पकडावाच लागेल. मग वादळाचे ढग निवळू लागतील. जहाजाला बसणारे हेलकावे थांबून यशाच्या किनाऱ्याकडे वाटचाल होईल. त्यासाठी तुमचे “हो’......का......यंत्र’ तुमच्याच तर हातात आहे!

सुभाष देशपांडे
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

(छात्र प्रबोधन च्या अंकातून पुनर्मुद्रित)

# कुठे जात आम्ही ........... पुढे काय आहे?

दहावी आणि बारावी या परीक्षांमुळे आपल्या मुलांचे आयुष्य दोन वर्षांनी कमी होते असे माझे मत आहे. म्हणजे खूप अभ्यास केल्याच्या श्रमांनी, थकव्याने नाही बरे का! तर ही दोन वर्षे बहुतेकांच्या आयुष्यातून वजाच झालेली दिसतात म्हणून. नववी आणि अकरावीतच vacation batch चे वेध सुरू होतात आणि वर्षभर परीक्षेच्याच वातावरणात बिचारी मुलेमुली खितपत पडलेली असतात. या परीक्षांच्या अभ्यासासाठी किंवा अभ्यासाच्या दडपणाखाली सुट्टीत आणि वर्षभर अन्य काही न करणे म्हणजे आयुष्यातील दोन वर्षे घालवल्यासारखे नाही का? बरे, एवढा आटापिटा करून शेवटी उत्तम गुण मिळवायचे (ज्ञान, कौशल्ये नाही तर टक्केवारी म्हणजेच गुण!) ते मनासारखी विद्याशाखा, महाविद्यालय वगैरे मिळावे म्हणून. पण ते मुलांपेक्षा पालकांच्याच मनाप्रमाणे जास्त ठरलेले असते! तरीही दहावी, बारावीनंतर प्रवेश घेताना आपण आणि पालकांनीही पुरेसा विचार, माहिती गोळा केलेली असते का? व्यवसाय मार्गदर्शनावर सध्या बऱ्याच ठिकाणी व्याख्याने, पुस्तके उपलब्ध आहेत. या लेखात मी प्रत्यक्ष माहिती देण्यापेक्षा व्यवसाय-निवडीकडे बघण्याचा एक दृष्टीकोन मांडू इच्छितो आणि मी सुरूवात जशी काही धक्कादायी विधानांनी केली, तसाच हा दृष्टीकोन जरा वेगळ्या प्रकारचा विचार करायला लावणारा आहे.

**शोध स्वत:चा**

पहिला मुद्दा म्हणजे दहावीपर्यंत आपल्याला फारसे पर्यायच नसतात. (तिसरी भाषा निवडण्यापलीकडे) पण आता दहावीनंतर अनेक पर्याय समोर दिसतात. मग त्यातून निवड करताना काही वेळा भांबावल्यासारखे होते तर काही वेळा ज्याची एकुणात चलती जास्त तो पर्याय आपला, अशी सोप्या पद्धतीने निवड होते.म्हणून पर्याय निवडताना आपली आवड आणि त्याबरोबर आपल्या क्षमता (शक्तिस्थाने व मर्मस्थाने, strength and weakness) माहिती असणे फार जरूरीचे आहे. या वयात अभिक्षमता चाचणी (Aptitude Test) उपयोगी पडते; पण मर्यादित प्रमाणात; म्हणून आपणच चक्क कागद -पेन्सिल घेऊन स्वत:च्या आवडी निवडी,स्वत:मधील क्षमता आणि उणिवा यांचा सविस्तर विचार केला पाहिजे. कोणती परिस्थिती आपल्याला 'संधी' वाटते आणि कोणती परिस्थिती आपल्याला 'संकट' वाटते याचा अंदाज घेतला पाहिजे.त्यासाठी आपले आत्तापर्यंतचे अनुभव आणि मित्रमैत्रिणी, नातेवाईकांची मते यांचा जरूर विचार करावा. या स्वत:च्याच विश्लेषणाला इंग्रजीमध्ये SWOT (Strength, Weakness, Opportunity, Threat) ANALYSIS असे म्हणतात. अशी स्वत:बद्दलची संकल्पना काहीशी स्पष्ट केल्यावर मगच आपल्याला भोवतालच्या परिस्थितीचा विचार समतोलपणे करता येईल. तुम्हाला प्रारंभी हे खूप अवघडही जाईल कदाचित; कारण शाळांमध्ये अशा दृष्टीकोनातून स्वत:कडे स्वतंत्रपणे बघण्यास, विचार करण्यास कोणी सांगितलेही नसेल. तरी शांतपणे बसून रोज थोडी थोडी भर घालत हा विचार तुम्ही करा.

**भान परिस्थितीचे**

भोवतालच्या परिस्थितीचा विचार पाच मुद्यांमध्ये करू या.

१) आपल्या सगळयांनाच जाणवते की भोवतालचे जग वेगाने बदलते आहे. आजचे चलनी नाणे हे उद्या सर्व किंमत हरवून बसते. आज महत्त्वाच्या वाटणाऱ्या विद्याशाखा आणि नोकरीधंदे काही वर्षांत सहजपणे कालबाह्य झालेले दिसतात. त्यामुळे ४-६ वर्षानंतरच्या परिस्थितीचे भान ठेवून आणि आपल्या देशातील विविध गरजांचा आणि त्यानुसार बदलणाऱ्या शैक्षणिक,औद्योगिक,आर्थिक धोरणांचा अंदाज बांधून आपल्याला आज निर्णय घ्यावयाचा आहे.

२) भोवताली स्पर्धेच्या युगात सगळीकडे शर्यती चालल्या आहेत. भांडवल देऊ शकत नसल्याने आई-वडिलांवर राग धरणारे महान सुपुत्र दिसतात, तर माझ्या शिक्षणाला भारतात वाव नाही म्हणत परदेशी पळणारे देशभक्तही सापडतात. या जीवघेण्या स्पर्धांमध्ये स्वत:च्या क्षमतांच्या पलीकडची स्वप्ने पहाणे, कष्टाशिवायच्या यशाची आशा धरणे, स्वत: पुढे येण्यासाठी इतरांना मागे खेचणे, प्रसंगी चुकीची साधने, मार्ग वापरणे हे सर्व आपल्याला पदोपदी दिसत असते. या स्पर्धेच्या प्रवाहात पडून आयुष्यभर एका कडवट संघर्षाच्या चक्राशी स्वत:ला बांधून घ्यायचे का? आपली प्रवृत्ती अशी स्पर्धा करण्याची, नियमांशी खेळण्याची आहे का? याचाही विचार करायला पाहिजे.

३) शिक्षणपद्धतीवरही आपण मनसोक्त टीका करतो, वाचतो, ऐकतो; पण तरीही आपली सगळी तडफड त्याच शिक्षणप्रणालीतील ठराविक अभ्यासक्रम पूर्ण करणे यासाठी चालते. नंतरचे आयुष्य, त्यात सामोरी येणारी परिस्थिती आणि आपल्याला मिळणारे शिक्षण यांची सांगड खूपच कमी असते. त्यात स्वत:ची आवड, क्षमता आणि विद्यापीठाचे शिक्षण यांचीही परस्पर संगत जमली नाही तर नक्कीच आयुष्यभर पदोपदी ठेचा लागण्याचा संभव असतो.

४) एखादी विद्याशाखा अभ्यासाला निवडणे, त्यात पारंगत होणे आणि त्या विद्याशाखेत व्यवसाय करणे, नोकरी करणे यात खूपच फरक आहे. Service conditions म्हणजे प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणचे वातावरण व परिस्थिती याचा आधी कधीच अनुभव नसतो आणि मग कामाच्या ठिकाणी कंटाळा, निराशा, न्यूनगंड जाणवू लागतो.

५) स्वत:च्या क्षमतांचा दहावी-बारावीत नीट अंदाज येत नाही. सभोवतालचे अभ्यासाचे वातावरण व दडपण, परीक्षेचा ठरावीकपणा व त्यांना अनुसरून क्लासेसमधून मिळालेले प्रशिक्षण यांचाच आपल्या performance मध्ये जास्त वाटा असेल, तर दहावी, बारावीचे यश नंतर टिकवणे खूप अवघड जाते आणि त्यातून न्यूनगंड, निराशा, समाजाबद्दलची एक उगीचच चीड मनामध्ये भरून राहू शकते.

**शिक्षण पद्धतीवर टीका करत त्याच पद्धतीमधील लौकिक यश मिळवायला धडपडायचे, जीवघेणी स्पर्धा व त्यातील अमानवीपणा याला नाके मुरडत त्याच प्रवाहात सामील व्हायचे आणि या सगळ्यासाठी स्वत:चे शरीर, बुद्धी आणि मन यांची किंमत द्यायची. या चक्रातून सुटकेचा काही मार्ग आहे का?** मला वाटते, आहे आणि तो म्हणजे जीवनाकडे बघण्याचा एक positive निकोप दृष्टीकोन.

### दृष्टीकोन आयुष्याचा

असा एखादा विषय शोधून काढा की ज्यात तुम्हाला फक्त काम यशस्वी झाल्यावरच नाही तर प्रत्यक्ष काम चालू असतानाही आनंद वाटेल; मग ती एखादी शस्त्रक्रिया असो, शिकविणे असो, गणित असो किंवा माहितीचे अन्वयार्थ लावणे असो. असे काही कलाकार असतात की त्या चित्राच्या, शिल्पाच्या किंवा कवितेच्या निर्मितीमध्येच त्यांना पराकोटीचे समाधान लाभते. नंतर त्यांच्या कृतीचे कौतुक कसे होते किंवा कौतुक होत नाही याबद्दल त्यांना काही सोयरसुतक नसते.सध्याच्या जगात याला job satisfaction म्हणतात की, जे पगार, प्रतिष्ठा, सुरक्षितता या सर्वांच्या पलीकडील काहीतरी असते. जसे एखाद्या मित्राच्या संगतीमध्ये आपल्याला आनंदी वाटते तसे. परीक्षेसाठी एखादा भाग पाठ करून लिहिणे यापेक्षा त्या भागातील बारकाव्यांची समज येणे यात जास्त आनंद लपलेला असतो. माणूस हा जात्याच चौकस आणि प्रतिभावान प्राणी आहे. आपल्या आवडीच्या विषयातच आपल्या चौकस बुद्धीला आणि प्रतिभाशक्तीला वाव मिळू शकतो; म्हणून पैसा, प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या पदव्यांपेक्षा आपल्या आवडत्या विषयातील पदवी व त्याच्या संगतीतील काम याची निवड करा.

इंजिनिअरींग आणि मेडिकल ही दोनच क्षेत्रे शिक्षणाची महाद्वारे आहेत की ज्यातून गेल्यावरच फक्त मान-सन्मान, प्रतिष्ठा, लौकिक मिळेल असे अनेकांना वाटते. नव्हे, गेल्या काही वर्षांत हे सर्वमान्य,उघड वास्तव बनले आहे. असेच झाले तर उद्याचा समाज एकांगी होणार नाही का? समाजाला सुदृढ बनविणारे शिक्षक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार यांच्या जागा उद्या कोण घेणार? नारळीकर, गोवारीकर, माशेलकर नाहीत, पु.ल., कुसुमाग्रज नाहीत, भीमसेन जोशी, हुसेन

यां शिवाय फारशा प्रसिद्ध नाहीत तरी समाजाचे आधारस्तंभ असलेल्या अशा भोवतालच्या अनेक थोर व्यक्ती आठवा. या सर्वांच्या जागा उद्या कोण घेणार?

**'स्व'चे प्रकटीकरण**

एका मानसशास्त्रज्ञाच्या मते 'स्व'चे प्रकटीकरण (Self actualization) ही माणसाची सर्वोच्च गरज असते. ही गरज भागली असता माणूस खऱ्या अर्थाने कायमचा सुखी होऊ  शकतो.एखाद्या मोठ्या यंत्रणेचा, कारखान्याचा एक परावलंबी घटक होण्यापेक्षा **ज्या क्षेत्रात तुमच्यातील अनेक सुप्त गुणांच्या प्रकटीकरणाला वाव आहे असे क्षेत्र निवडावे. मग ते छोटेच, फारसा नावलौकिक नसलेले असले तरी हरकत नाही. त्यात आपले सर्वस्व ओतण्यामध्ये काही वेगळाच आनंद असतो.** अशी काही म्हत्त्वाची आणि त्यात तुमच्या स्वतंत्र वृत्तीला व माणूसपणाला वाव आहे अशी काही क्षेत्रे मी सुचवू शकेन. शिक्षण, प्रसारमाध्यमे आणि प्रशासन (सरकारी यंत्रणा, पोलीस इत्यादी) यांमध्ये चांगल्या कामात आनंद घेणाऱ्या व स्वत:च्या आवडीने येणाऱ्या माणसांची खूप गरज आहे. या क्षेत्रांसाठी तुमची पदवी कोणत्याही विषयातली चालते. तसेच तुमच्या मनातील सामाजिक जाणिवेलाही या क्षेत्रात खूप संधी मिळू शकते. शास्त्र-तंत्रज्ञान क्षेत्रामध्येही समुचित तंत्रज्ञान, ते लोकांपर्यंत पोहोचविणे आणि रोजगार निर्मिती ...... या दृष्टीने स्वत:चे असे छोटे छोटे पण स्वतंत्र उपक्रम चालवावेत.

**पूर्णत्वाचे प्रवासी होऊ या !**

खेळाच्या उदाहरणातून हा दृष्टीकोन स्पष्ट होईल. काही वेळा खूप मजबूत संघाकडून एखाद्या कमकुवत संघाविरूद्ध खेळण्याचा प्रसंग येतो. मग आपण नवीन खेळाडूंना संधी देऊन किंवा नवीन पद्धतीचा प्रयोग करून किंवा काही ठरावीक कौशल्यांचाच सराव करून घ्यायचा असे ठरवून त्या सामन्यातील रंगत वाढवतो; पण माझ्या मते खेळातील खरी रंगत येते ती आपल्यापेक्षा वरचढ संघाविरूद्ध लढण्यात. ज्यावेळी आपल्यातील सर्व शारीरिक, बौद्धिक क्षमता पणाला लावाव्या लागतात, तेव्हा आपल्याही नकळत आपल्यातील एखादे सुप्त कौशल्य आपल्याला चकित करत व्यक्त होते. तेव्हाच हारजीत यांच्या पलीकडे जाऊन आपल्याला खेळातील निर्भेळ मजा, आनंद चाखायला मिळतो.आणि एखाद्या तुल्यबळ संघाविरूद्ध लढताना आपण सर्व कसब दाखवून विजय मिळवतो तेव्हा किंवा त्यांच्या कौशल्याची नोंद घेत अटीतटीची हार पत्करतो तेव्हा आपल्यातील खेळाडू हा जास्त पूर्णत्वाकडे प्रवास करत असतो.

असे आपण पूर्णत्वाचे प्रवासी होऊयात. आयुष्याच्या वाटचालीत चाकोरी-पैसा-प्रतिष्ठा यापेक्षा नावीन्य-आवडते कार्यक्षेत्र-मित्रपरिवार यांची साथ जास्त विश्वासार्ह व मोलाची, समाधानकारक असणार हे समजून निर्णय घेऊ या.

वा.विवेक कुलकर्णी
ज्ञान प्रबोधिनी,पुणे

(छात्र प्रबोधन च्या अंकातून पुनर्मुद्रित)

# अभिमापन क्षमता चाचणी

सध्याच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात करिअरला विशेष महत्त्व आहे. विद्यार्थी आणि त्यांचे पालक आता जागरुक होऊन याबद्दलचा विचारही करायला लागले आहेत. या संबंधातील माहिती खूप पेपरमधून पुस्तके,इंटरनेट या माध्यमातून मिळत असते.

आपल्याला काय जमेल याचा विचार प्रत्येक विद्यार्थ्यांनी करणे जास्त गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांच्या पालकांनाही आपल्या मुलाच्या क्षमता काय आहेत याचा अंदाज असतो. वेगवेगळया अभ्यासक्रमासाठी वेगवेगळया क्षमता, आपली आवड आणि आपले व्यक्तिमत्व कसे आहे याची सांगड घालावी लागते.

विद्यार्थ्यांने 10 वी 12 वी नंतर शिक्षण कोणते घ्यायचे याचा विचार करावा. हे करत असताना नियोजन करणे खूप महत्त्वाचे आहे. हे केल्यामुळे विद्यार्थ्यांना ताण येत नाही. 10 वी नंतरही अनेक क्षेत्रांचा विचार करावा लागतो.प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला काय आवडते याचा विचार करावा. ज्या क्षेत्राचा तुम्ही विचार करणार आहात त्या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींशी बोला. त्यांच्या कामाच्या पद्धती समजून, आपले शिक्षण संपल्यानंतर ह्या क्षेत्रात काम करायला आवडेल का? याचा जरूर विचार करा.

घरातील व्यक्तींशी संवाद साधणे अतिशय गरजेचे आहे. संवादामधून अनेक गैरसमज दूर होतात. मुलांना काय मदत हवी आहे हे मोकळेपणाने पालकांशी बोलले पाहिजे कारण पालकांचा अनुभव त्यांच्या पाठीशी असतो. आपण एकमेकांशी संवाद साधतो किंवा बोलतो त्यावेळी आपली बोलण्याची पद्धत कशी आहे, टोन कसा आहे हे महत्त्वाचे आहे. याचे परिणाम विद्यार्थ्यांवर होत असतात.

बौद्धिक क्षमता ही प्रत्येक व्यक्तीची वेगवेगळी असते. कोणत्या तरी एका पैलूवर ती क्षमता जास्त असते. ती समजणे हे जास्त महत्त्वाचे असते. उदा. तीव्र बुद्धिमत्ता असलेल्या, विशिष्ट प्रकारची प्रज्ञा प्रखर असलेल्या मुलामुलींच्या बाबत करिअर मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तीला सूक्ष्म बारकावे अधिक लक्षात घ्यावे लागतात. अशा प्रज्ञावंतांचे एकुण व्यक्तिमत्त्व,विचार करण्याची पद्धत, त्यांना आवडू शकतील अशी आव्हाने ही महत्त्वाची करतात त्याच्या विरूद्ध उदाहरण बघू.

LD किंवा slow learning अशा विद्यार्थ्यांना ठराविक क्षेत्रामध्ये (शाखांमध्ये) शिक्षण घेणे अवघड जाते पण त्यांच्यात कोणती क्षमता चांगली आहे? कोणता गुण चांगला आहे हे लक्षात घेऊन त्यात त्यांना शिक्षण देऊन नोकरी,व्यवसाय असे करता येते. कोणतीच व्यक्ती काहीच करू शकत नाही असे होत नाही. त्यांची आवड आणि क्षमता लक्षात घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून मार्ग नक्कीच सुचविता येतो.

पुढील शिक्षण घेण्यासाठी महत्त्वाच्या क्षमता आपल्यामध्ये असणे गरजेचे आहे म्हणजेच इंजिनीअरींगला जायचे आहे तर आपल्याला गणित आणि फिजिक्स हे विषय आवडताना हे लक्षात घ्यायला पाहिजे. गणित आणि भौतिकशास्त्र (फिजिक्स) यांच्या मूलभूत संकल्पना पक्क्या असणे गरजेचे आहे तो पाया आहे. तसेच Arts ला जायचे असेल तर भाषेवर प्रभुत्व असणे, लिखाण आणि वाचन याची आवड आणि तयारी दोन्ही गोष्टी लागतात. एक उदाहरण बघू. एक 10 वी मधील विद्यार्थिनी. तिला कॉमर्स आणि CA करायला सांगितले. CA म्हणजे आपल्याला महत्त्व प्राप्त होईल. तो एक स्टेटस आहे हे पक्क मत होते. FY. B. Com नंतर report घेऊन Aptitude Test ला माझ्याकडे आली. report बघितल्यानंतर क्षमता सर्व अति उत्तममध्ये पण कल (आवड) बघितली तर कलात्मक, व्यवहारज्ञान काहीच नाही जे कॉमर्सला जास्त आवश्यक आहे.तिला सांगितले की CA चा हट्ट सोड कारण CPT दोनदा दिली होती पण यश आले नाही. B. Com. चांगल्या मार्कांनी पास हो आणि Mass.com च्या परीक्षेची तयारी कर. ती लिखाण छान करते,

कुठेही ट्रेकिंग किंवा ट्रीपला गेली तरी त्या कलात्मक दृष्टीकोनातून बघते आणि आल्यावर त्याचे वर्णन इतके सुरेख लिहिते की त्यामुळे तिला असे लिखाण कर असे सुचविले. ते सर्व तिने मायबोलीवर टाकले. त्याचा प्रतिसाद तिला छान मिळाला. यामुळे तिला आत्मविश्वास मिळाला. तिने खूप छान तयारी पूर्वपरीक्षा Mass.com साठी केली आणि तिला पुणे विद्यापीठात ॲडमिशन मिळाली. तिची मुलाखतही घेतली तीपण सर्वांना आवडली असा Feedback त्यांनी तिला दिला. यामुळे ती इतकी आनंदी आहे. म्हणून Aptitude Test कला चाचणी योग्य वेळी केली की त्याचा फायदा हा विद्यार्थ्यांना होतो. आपली बलस्थाने आणि कमी क्षमता या आपल्या लक्षात येतात त्यावरून त्याच्यामध्ये आपल्याला improvement करता येते; कारण नुसत्या क्षमता मोजून चालत नाही तर त्याला आपले व्यक्तिमत्त्व जुळते का? हे बघणे महत्त्वाचे आहे. कलचाचणी ही ज्ञान प्रबोधिनीत उपलब्ध आहे. आत्तापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे. या चाचणीवरून त्याचा सविस्तर अहवाल Report मिळतो. त्यात क्षमता आणि स्वाभाविक -वैचारिक कल मोजला जातो. पुढील शिक्षणासाठी आवश्यक अशा क्षमतांचा आणि कल यांत विचार केला आहे. या test report वरून मार्गदर्शन करताना report,पालकांचे शिक्षण, आर्थिक परिस्थिती, मुलांची आवड या सर्वांचा विचार करावा लागतो. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हे मार्गदर्शकाचे महत्त्वाचे काम आहे. कोणता अभ्यासक्रम नीट शिकू शकेल हे सांगणे हे जास्त महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचे 5 – 7 वर्षा नंतर शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरीच्या संधी कशा उपलब्ध असतील याचा अंदाज पालकांनी घेतला पाहिजे व ते मुलांना सांगितले पाहिजे. ज्ञान प्रबोधिनीत जी Aptitude test घेतली जाते ती प्रमाणित केलेली चाचणी आहे. त्याला २.३० ते ३ तास लागतात. Computer वर ती देता येते व त्याला कोणत्याही पूर्वतयारीची आवश्यकता नाही.

यात ८ प्रकारच्या **क्षमता** मोजल्या जातात आणि ५ प्रकारचे **कल** मोजले जाते.

१. सर्वसामान्य आकलन क्षमता (Cognitive Ability)
२. तर्कविचार क्षमता (Reasoning Ability)
३.अभाषिक क्षमता (Figural Memory)
४. अवकाशबोधन क्षमता (Spatial Ability)
५.भाषिक क्षमता (Verbal Ability)
६.सामाजिक क्षमता (Social Ability)
७.अंकज्ञान क्षमता (Numeral Ability)
८. अंकस्मृती (Numeral Memory)

**स्वाभाविक वैचारिक कल** (Orientation)

१. तात्त्विक-वैचारिक कल (Knowledge)
२. व्यावहारिक दृष्टीकोन (Practical)
३. कलात्मक कृती (Artistic)
४. सामाजिक कल (Social)
५. महत्त्वाकांक्षी (Power)

यावरून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे महत्त्वाचे आहे . यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्याची मेहनत करण्याची इच्छा असणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्याला जास्तीत जास्त फायदा व्हावा हा या मागचा मुख्य उद्देश आहे.

निलिमा आपटे
JPSS - ATC

### अभिक्षमता मापन (Aptitude Test) माहिती

सध्याची प्रचलित शिक्षण पद्धती व त्यानंतरच्या व्यवसाय निवडीबाबत सध्याचे पालक व पाल्य बऱ्याचदा संभ्रमात असतात. हा संभ्रम दूर होण्यासाठी या चाचणीची मदत होऊ शकते. यासाठी ज्ञानप्रबोधिनी संशोधन संस्थेच्या वतीने अभिक्षमता मापन चाचणी घेतली जाते. ही चाचणी प्रमाणित आहे. इयत्ता दहावी पासून बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता देता येते. यासाठी कोणत्याही पूर्वतयारीची आवश्यकता नसते.

चाचणी मराठी व इंग्रजी भाषेमध्ये संगणकावर (Computer) देता येते. चाचणीचा निकाल लगेच किंवा दुसऱ्या दिवशी मिळतो. चाचणीसाठी २.३० ते ३.०० तास लागतात. तिथे पालकांना प्रवेश नसतो. चाचणीच्या निकालावरून मार्गदर्शन केले जाते.

या चाचणीतून विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या क्षमता व कल मोजले जातात. काही शालेय विषय मुलांना उत्तम कळतात,कारण त्या विषयाचे आकलन होण्यास लागणाऱ्या क्षमता त्यांच्याजवळ असतात. याउलट एखादा विषय समजण्यास कठीण जात असेल तर त्याची नेमकी कारणे या चाचणीतून कळल्याने लगेचच उपाय सुचविता येतात. त्यायोगे अभ्यासातील उत्साह कायम राहण्याकरिता मुलांना मार्गदर्शनाच्या वेळेला प्रोत्साहन दिले जाते. अभ्यास करण्याच्या पद्धतीत काही बदल करणे गरजेचे असल्यास ते सुचविता येतात. तसेच आढळलेल्या क्षमतांच्या आधारावर विद्यार्थ्यांनी कोणता अभ्यासक्रम निवडावा याची दिशा मिळू शकते.

चाचणीचा सविस्तर अहवाल मिळतो. या चाचणीनंतर होणारे मार्गदर्शन महत्वाचे असते. विद्यार्थ्यांचा आलेला अहवाल,त्याला मिळणारे गुण,कौटुंबिक पार्श्वभूमी या सर्वांचा विचार करून मार्गदर्शन केले जाते.

### स्वयम (SWAYAM)

विद्यार्थी दशेमध्ये अभिक्षमता चाचणी करणे व त्यानुसार कल बघून शिक्षणाची दिशा ठरविणे हे प्रचलित होत आहे. परंतु औपचारीक शिक्षण पुर्ण केल्यानंतर लगेच किंवा कालांतराने तसेच व्यावसायिक क्षेत्रात पाऊल टाकताना,व्यवसाय किंवा नोकरी करताना त्यामध्ये मिळणारे यश हे केवळ त्या व्यक्तिची मेहनत किंवा प्रयत्नांवर अवलंबून नसून त्या व्यावसायिक कामाकरता त्या व्यक्तिच्या क्षमता कितपत योग्य आहेत, यावर अवलंबून असण्याची शक्यता आहे.

एखादी व्यक्ती सतत नोकरी सोडते किंवा बदलते याची नक्की कारणे कोणती व त्या कारणांचे विश्लेषण करणे व अभ्यास करणे हे सुद्धा मानसशास्त्रज्ञासमोर एक आव्हान आहे. याच प्रश्नांच्या धर्तीवर ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेने "स्वयम्" (Studies & Work related Aptitudes in Youth– Advance Measurement) या नावानी चाचणी विकसित केली आहे.

व्यक्तींची मानसिकता आणि त्या मानसिकतेचा त्याच्या व्यवसायावर / कामावर होणारा परिणाम या सगळ्यांचे तांत्रिक विश्लेषण करणे हा या चाचणीचा उद्देश आहे.

सदरची चाचणी संगणकावर देता येते. या चाचणीसाठी तीन तास लागतात. ती मराठी/ इंग्रजी माध्यमातून देता येते. या चाचणीमधून वर उल्लेखलेल्या कारणांसाठी क्षमता,कल आणि व्यक्तिमत्वाचे विविध पैलू मोजले जातात.

**Contact**

**Jnana Prabodhini Bhavan**

**510.Sadashiv Peth, Pune - 411030**

**Tel : 020 - 24207106, 24207137, 65220114**

**E-mail : nilima.apte@jnanaprabodhini.org**

# दिशा दर्शन

स्वत:चे भवितव्य ठरविण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या इ.९ वी ते १२ वी तील मुला-मुलींसमोर यक्ष प्रश्न असतो तो करिअर निवडीसाठी अभिवृत्ती मापन,समुपदेशन यासारखी साधने वापरली जाऊ लागली आहेत. या साधनांना पूरक अशा दृक् -श्राव्य डी.व्ही.डी.संचाची निर्मिती ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक साधन केंद्राने केली आहे.

**शास्त्रशाखा**

१. रसायनशास्त्र - डॉ. डी.जी.नाईक
२.भौतिकशास्त्र - डॉ.अजय नांदगावकर
३.जीवशास्त्र - डॉ.राजेंद्र देवपूरकर
४.गणित - डॉ.अभिजित रांजेकर
५.भूगोल - डॉ.श्रीकांत कार्लेकर
६.मानसशास्त्र - डॉ. अनघा लवळेकर
७. सैन्यदल - कर्नल प्रदीप ब्राम्हणकर
८. पुरातत्त्वशास्त्र - डॉ.श्रीनंद बापट

**मूलभूत विज्ञानाचे क्षेत्र वैद्यकी अभियांत्रिकी इतकेच महत्वाचे ठरत आहे. संशोधनाची आवड असणाऱ्यांना या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून विविध पर्यायांची माहिती मिळेल आणि मनाजोगी करिअर करता येईल.**

---

**वाणिज्यशाखा आणि प्रशासकीय अधिकारी**

१. चार्टर्ड अकाउंटंट - अभय माटे
२. कंपनी सेक्रेटरी - गजानन कुलकर्णी
३. प्रशासकीय अधिकारी, राज्यस्तर - आराधना निकम
४. प्रशासकीय अधिकारी, केंद्रीय स्तर - सविता कुलकर्णी
५. विमा अधिकारी - सोमदत्त पटवर्धन
६. बँकिंग - अनिल बिजूर
७. कॉस्ट अकाउंटंट - रूपेश शहा

**उदरीकरण आणि खाजगीकरणाच्या आजच्या जगात अर्थव्यवहार,व्यापार आणि प्रशासन-व्यवस्थापनाचे महत्त्व वाढते आहे. या क्षेत्रातील संधीचा फायदा घेण्यासाठी ह्या क्षेत्राविषयी मूलभूत माहिती देणाऱ्या मुलाखती मार्गदर्शक ठरतील .**

---

**इंजिनिअरींग**

१. यांत्रिकी - मिलिंद संत
२. विद्युत - उज्वला माटे
३. बांधकाम- गणेश जाधव
४. संगणक - डॉ. शुभांगी केळकर
५. विद्युतअणु - सारिका फाटक
६. रसायन - दीप्ती मराठे

**अभियांत्रिकी अर्थात इंजिनिअरींगला जायचे स्वप्न सगळ्यांचेच असते. पण इंजिनिअरींग म्हणजे काय? इंजिनिअरींगच्या विविध शाखा कोणत्या? यासारख्या प्रश्नांची उत्तरे आणि तपशील देणाऱ्या मुलाखती मार्गदर्शक ठरतील.**

## आरोग्य

१. ॲलोपॅथिक डॉक्टर - डॉ.प्रद्युम्न वैद्य
२. आयुर्वेदिक डॉक्टर - डॉ. प्रशांत सुरू
३. होमिओपॅथिक डॉक्टर - डॉ. तेजश्री आपटे
४. फिजिओथेरपी - डॉ. शर्मिला परळीकर
५. नर्सिंग - डॉ. स्नेहलता सहस्त्रबुद्धे
६. फार्मसी - मिलिंद कुलकर्णी
७. आहारतज्ज्ञ - डॉ. अश्विनी गोडबोले

**आरोग्याच्या क्षेत्रात ॲलोपॅथिक वैद्यकी इतक्याच महत्त्वाच्या अनेक शाखा आहेत. वैद्यकीय सेवेची आवड असणाऱ्यांना तज्ज्ञांकडून विविध पर्यायांची माहिती मिळेल आणि मनाजोगी करिअर करता येईल.**

---

## कला आणि इतर

१.संगीत - राहुल देशपांडे
२. कमर्शियल आर्ट - बिपिन दफ्तरदार
३.ॲनिमेशन - राजेश खेले
४. नृत्य - ऋजुता सोमण
५. आर्किटेक्ट - अदिती नवगिरे
६. फिल्म आणि मिडिया कम्युनिकेशन - गिरीश केमकर
७. शिक्षक - प्रसाद जोशी
८. मॅनेजमेंट - गिरीश फणसळकर
९. वकील - ॲड. सायली गानू
१०. परकीय भाषा - मेधा पूरकर
११. पत्रकार - संजय तांबट
१२. समाजसेवा - राजश्री तिखे
१३. खेळ आणि शारीरिक शिक्षण - मनोज देवळेकर

**कला ही केवळ आनंददायी छंदापुरती राहिलेली नाही. कलेमध्ये करिअर करणे हे आता प्रतिष्ठेचे आणि आर्थिकदृष्ट्या सन्मानाचेही आहे. या मुलाखतींमधून परिचय करून दिला आहे. काही खास करिअर्सचा.**



# Disha Darshan

Students from 9th to 12th face the daunting task of choosing a career. Lately, tools such as 'Aptitude test' and counselling which prove a help in choosing a career have been in vogue. A set of audio-visual DVD's that supplement these diagnostic tests has been produced by Jnana Prabodhini's.

**Science**

1. Chemistry - Dr. D. G. Naik.
2. Physics - Dr. Ajay Nandgaonkar
3. Biology - Dr. Rajendra Deopurkar
4. Maths - Dr. Abhijeet Ranjekar
5. Geography - Dr. Shrikant Karlekar
6. Psychology - Dr. Anagha Lavlekar
7. Defense - Col (Retd) Pradeep Brahmankar

Basic Sciences have become as important as Medical-Engineering fields. Those having research aptitude will get information from the experts in this field to select a career in basic science.

---

**Commerce and Civil Services**

1. Chartered Accountant - Abhay Mate
2. Company Secretary - Gajanan Kulkarni
3. Civil Services - Savita Kulkarni
4. Insurance - Somdatta Patwardhan
5. Banking - Anil Bijur
6. ICWA - Rupesh Shah

In the era of privatisation and liberalisation, financial matters, commerce, administration and management are gaining importance. Interviews in this DVD will guide the viewers about basics of these fields to explore opportunities in them.

---

**Engineering**

1. Mechanical Engineering—Milind Sant
2. Electrical Engineering - Ujjwala Mate
3. Civil Engineering - Ganesh Jadhav
4. Computer Engineering—Dr.Shubhangi Kelkar
5. Electronics Engineering - Sarika Phatak
6. Chemical Engineering - Deepti Marathe

Everyone dreams to enter engineering career, but what is engineering? What are different branches of engineering? Such questions are answered in these informative interviews.

## Health

1. Allopathic Medicine - Dr. Prdumna Vaidya
2. Ayurvedic Medicine - Dr. Prashant Suru
3. Homeopathic Medicine - Dr. Tejashree Apte
4. Physiotherapy - Dr. Sharmila Paralikar
5. Nursing - Ujjwala Jadhav
6. Pharmacy - Millind Kulkarni
7. Dietician - Dr. Ashwini Godbole

Beyond Allopathic medicine there is much more to explore the health sector. Those who are interested in medical care will get details of different options in this field to select interesting career.

---

## Arts and Other

1. Music - Sameer Dublay
2. Commercial art - Bipin Daftardar
3. Animation - Rajesh Khele
4. Dance - Shama Bhate
5. Architect - Aditee Navgire
6. Film and Media - Girish Kemkar
7. Teaching - Prasad Joshi
8. Management - Girish Phansalkar
9. Lawyer - Adv. Saylai Ganu
10. Foreign Languages - Medha Purkar
11. Journalism - Sanjay Tambat
12. Social Work - Meena Gokhle
13. Sports - Manoj Deolekar

In our life Arts have become much more than simple hobbies. Today careers in Arts are prestigious and financially sound. This DVD introduces some special careers in Arts.

---



# ज्ञान प्रबोधिनी

## शैक्षणिक साधन केंद्र

इ. ९ वी ते १२ वीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या मुला-मुलींसमोर यक्ष प्रश्न असतो तो 'करिअर निवडीचा' करिअर निवडीसाठी अभिवृत्ती मापन, समुपदेशन यासारखी साधने वापरली जाऊ लागली आहेत. या साधनांना पूरक अशा दृक्‌श्राव्य डी.व्ही.डी. संचाची निर्मिती ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक साधन केंद्राने केली आहे.

### 'दिशा दर्शन' डी.व्ही.डी. संचाची वैशिष्ट्ये

शास्त्र, वाणिज्य, कला, इंजिनिअरिंग, आरोग्य या शाखांमधील अनेक करिअर उलगडून दाखवणाऱ्या ४१ मुलाखती ५ डी.व्ही.डींच्या संचात उपलब्ध

- विविध प्रकारच्या अनुभवी व्यावसायिकांच्या मुलाखती
- करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी आवश्यक गुणसंपदा आणि कौशल्यांची ओळख
- प्रत्येक करिअरच्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती
- प्रत्येक करिअरमधील संधी आणि आव्हाने

**संपूर्ण संचाचे देणगी मूल्य रु. २०००/-**
**एका डी.व्ही.डी. चे देणगी मूल्य रु. ४५०/-**

संपर्क : ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र
सौ. गीता साठ्ये - ९८२२६६०६८३, श्री. प्रकाश रणनवरे - ९८२३१५३९४८

खालील मागणी पत्रक भरून आपली मागणी नोंदवावी.

शाळेचे नाव :
शाळेचा पत्ता :
शाळेचा दूरभाष :
मुख्याध्यापकाचे नाव :
भ्रमणध्वनी :
पैसे पाठवण्याचा प्रकार : MO / DD / Chaque
(बाहेरगावचा धनादेश असल्यास २५ रु. जास्त वटनावळ पाठवावी.)

दिशा दर्शन

तपशील : संपूर्ण संच / शास्त्र / वाणिज्य / कला / इंजिनिअरिंग / आरोग्य

आपण आपली मागणी ई मेल ने नोंदवू शकता. e-mail: erc@jnanaprabodhini.org
पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०


## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.
दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४
ई - मेल : erc@jnanaprabodhini.org
Visit us at : **www.erc-pune.org**